# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०६/०८/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**१) पो.स्टे. एमआयडीसी बोरी –** दिनांक ०५/०८/२०२२ चे १४.०० वा. चे सुमारास पो.स्टे. एमआयडीसी बोरी हद्दीत फिर्यादीयांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रॉय मो.क्र. ९९२३४२४७६७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल –** दिनांक ०४/०८/२०२२ चे १५.०० वा. ते १५.३० वा. चे सुमारास पो.स्टे. काटोल हद्दीत फिर्यादीयांची १२ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लोखंडे मो.क्र. ७७२१९८१४३०० हे करीत आहे.

**३) पो.स्टे. कुही –** दिनांक ०४/०८/२०२२ चे १३.३० वा. चे सुमारास पो.स्टे. कुही हद्दीत फिर्यादीयांची १७ वर्षीय अल्पवयीन बहीन हीला अज्ञात आरोपीने फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ठमके मो.क्र. ८७८८५५३१३९ हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

**१) पो.स्टे. रामटेक :–** अंतर्गत जयप्रकाश वार्ड रामटेक येथे दि. ०२/०८/२०२२ चे १६.०० ते १६.३० वा. सुमारास **शंकर दयाराम मोहनकर (मृतक) वय ४४ वर्ष रा. जयप्रकाश वार्ड रामटेक** हा आपल्या राहते घरी घरगुती कारणावरून विषारी औषध सेवन केले. त्याची प्रकुती खराब झाल्याने त्यास प्रथम उपचाराकामी उपजिल्हा रूग्णालय रामटेक येथुन रेफर मेडीकल कॉलेज नागपुर येथे दि. ०२/०८/२०२२ रोजी भरती करण्यात आले होते. दि. ०३/०८/२०२२ चे रात्री ३:०० वा. डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले. करीता सदर मर्ग डायरी नागपुर (ग्रामिण) येथुन टपाल द्वारे दि. ५/०८/२०२२ रोजी पो.स्टे. रामटेक येथे प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ.वैशाली शंकर मोहनकर, वय ३२ वर्ष, रा. जयप्रकाश वार्ड रामटेक यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक योगेश भुरे पोस्टे रामटेक मो.न. ७७२२००३६७३हे करीत आहे.

२) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत ३० कि. मी. अंतरावरील मौजा नांद शेत शिवार येथे दि. २७/०७/२०२२ चे २२.०० सुमारास **विजय पांढुरंग फरकाडे(मृतक), वय ४५ वर्ष, रा. गळपेट वार्ड क्र. ५ नांद ता. भिवापुर** हे स्वताच्या शेतात मौजा नांद शिवारात जावुन अज्ञात कारणावरून विषारी औषधीचे स्वता सेवन केले. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास उपचाराकामी पिएचसी नांद व नंतर नागपुर मेडीकल हॉस्पीटल नागपूर येथे दि. २८/०७/२२ चे ११.३७ वा. भरती केले उपचार दरम्यान डॉक्टरांनी तपासुन दि. ०३/८/२२ रोजी मृत घोशीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार नागेश वाघाडे मो नं ८९७५५४२४४३ हे करीत आहे.

३) पो.स्टे. केळवद :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा रामपुरी येथे दि. २९/०७/२०२२ चे ११.०० वा. सुमारास **अविनाश रुपचंद डबले (मृतक), वय २६ वर्ष रा. रामपुरी तह. सावनेर जि. नागपूर** याने कर्जबाजारी व शेतात पिक येत नसल्याने त्याने आपले घरी शेतात फवारणी मारण्याचे विषारी औषध सेवन केली. त्यामुळे त्याची प्रकृती खराब झाल्याने उपचाराकामी खाजगी दवाखाना येथे भरती केले असता डॉक्टरांनी प्रथम उपचार करुन त्यानंतर खाजगी दवाखाना वेदांत हॉस्पीटल धंतोली नागपुर त्यानंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे दि. ०१/०८/२०२२ चे ०९. ३८ वा. भरती केले असता डॉक्टरांनी तपासुन दि. ०२/०८/२०२२ चे रात्री १०.०० वा. मृत घोषीत केले. सदर मृतकाचे कागदपत्रे पो.स्टे केळवद येथे दि. ०५/०८/२०२२ ला प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे मपोना पुनम मिश्रा पो.स्टे. केळवद यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार सुभाष राठोड मो. नं. ९८२३०७४७४२ हे करीत आहे.

४) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील संपत ढाबा कढोली येथे दि. ०५/०८/२०२२ चे १४.०० वा. ते १९.०० वा. सुमारास **राजेश राजकुमार यादव(मृतक), वय ४८ वर्ष, रा. गडकना ता. खबरपुर जि. आंबेडकर नगर (उत्तरप्रदेश)** हे श्री गजानन ट्रान्सपोर्ट अशीष कॉम्पलेक्स नाका क्र. १० वाडी रोड नागपुर चा मालक नामे कुष्णराव सव्वाशेरे यांचे कडे ट्रक क्र. NL-01/AB- 8670 चे चालकाचे काम करतो. ते नेहमी हल्दीराम कंपनी कढोली येथुन माल भरून उडीसा येथे खाली करतात. त्यांचा ट्रक दि. ०५.०८.२०२२ रोजी गोयल मोटर्स भंडारा येथे दुरूस्त करीत होते. परंतु त्यांना त्याचे गावी जायचे असल्याने त्यांचे ट्रान्सपोर्ट मध्ये ट्रक क्र. MH-01/CR-8710 चा चालक नामे हरीशंकर श्रीरामदेव यादव वय ३५ वर्ष रा. उपयाद्यापुर ता. पटी जि. प्रतापगढ हा मृतक यास आपले ट्रकमध्ये बसवुन संपत ढाबा कढोली येथे दि. ०५.०८.२०२२ चे अंदाजे ०२.०० वा. पोहचले व दोघे संपत ढाब्यावर जेवन करून हरीशंकर यादव हा आपले ट्रकमध्ये झोपायला गेला व मृतक संपत ढाब्यावर झोपला. त्यास हरीशंकर यादव हा संध्याकाळी ०७.०० वा. उठवण्याकरीता गेला असात मृतक झोपेतुन उठत नव्हता. तेव्हा संपत ढाबा मालक संदानंद वानखेडे यास बोलावुन त्याचे समोर त्यास हालवुन उठवले असता तो उठला नाही म्हणुन वानखेडे यांनी पोलीसांना फोन करून बोलावले पोलीस स्टाफ येवुन त्यास मेयो हॉस्पीटल नागपुर येथे घेवुन गेले. मेयो हॉस्पीटल येथील वैदयकिय अधिकारी यांनी मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— हरिशंकर श्रीरामदेव यादव, वय ३५ वर्ष, रा. उपयाद्यापुर ता. पटी जि. प्रतापगढ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि श्री मोहोड मो.क्र. ९८२३९१०१५६ हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

१) पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत मौजा जे.एस.डब्लु कॉलनी क्वार्टर नं १२ कळमेश्वर येथे दिनांक ०५/०८/२०२२ चे ०८:३० वा. ते १३.०० वा. दरम्यान **प्रितेश विष्णुकुमार ठाकोर (मृतक) वय ३६ वर्ष, रा. नांदाफाटा ता.कोरपना जि.चंद्रपुर ह.मु जे.एस.डब्लु कॉलनी क्वार्टर नं १२ कळमेश्वर** हे शेअर मार्केटमध्ये पैसे लावत असल्याने त्यात नुकसान झाल्याने त्याने स्वताचे राहते ठिकाणी जे.एस.डब्लू. क्वॉर्टर नं. १२ येथे दोरीने गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सौ. सोनाली प्रितेश ठाकोर, वय ३५ वर्ष, रा.नांदाफाटा ता.कोरपना जि. चंद्रपुर ह.मु जे.एस.डब्लु कॉलनी क्वार्टर नं १२ कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार प्रदीप गायकवाड मो.क्र. ९९२३०४१७३० हे करीत आहे.

२) पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत ५ कि. मी. अंतरावरील वार्ड. क्र ०२ सिल्लेवाडा येथे दिनांक ०५/०८/२०२२ चे १४:०० वा. दरम्यान **आकाश राजबहादुर कुरील (मृतक), वय २४ वर्षे रा. वार्ड नं ०२ सिल्लेवाडा** हा फिर्यादी नामे— राजबहादुर रामसजिवन कुरील, वय ५४ वर्ष, रा. वार्ड नं. २, सिल्लेवाडा यांचा मुलगा असुन फिर्यादी हा कामावरून घरी जेवन करण्याकरीता घरी आला असता घराचा दरवाजा आतुन बंद होता. फिर्यादीने दरवाजा ठोकला असता आतुन कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने घराच्या खिडकीतुन आत पाहीले असता मृतक हा अज्ञात कारणावरून घराच्या छताच्या लोखंडी पाईपला काळया रंगाची नायलॉन दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला. त्यास उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल नागपुर येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार नावेद खान मो नं ८२०८५११६६३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**